जैन समाजात प्रचंड खपाचे व लोकप्रिय मासिक

# जैन जागृति

(Since 1969) www.jainjagruti.in



❖ संस्थापक ❖

स्व. श्री. कांतीलालजी चोरडिया

६२ ऋतुराज सोसायटी, पुणे-सातारा रोड, भापकर पेट्रोल पंपा समोर, सिटी प्राईडच्या पुढची लेन, पुणे ४११०३७.

☎ : (०२०) २४२१५५८३

मोबाईल : संजय ९८२२०८६९९७, सुनंदा ९४२३५६२९९१

संपादक व प्रकाशक : संजय के. चोरडिया

संपादिका : सौ. सुनंदा एस. चोरडिया

❖ वर्ष ४९ वे ❖ अंक ५ वा ❖ जानेवारी २०१८ ❖ वीर संवत २५४४ ❖ विक्रम संवत २०७४

## या अंकात

| या अंकात | पान नं. |
|---|---|
| ● गुरु आनंद तीर्थ, चिचोंडी | १५ |
| ● ।। जिनेश्वरी ।। अध्याय २१ - समुद्रपाल | १९ |
| ● कव्हर तपशील | |
| ● सफलता का शॉटकट | २३ |
| ● हर जाएँ, पर हार न माने | २४ |
| ● ऐसी हुई जब गुरुकृपा - एक ने नमा | ३९ |
| ● मृत्यु को महोत्सव बनाएँ - बालमरण | ४० |
| ● आदमी 'सोच' है - (२) | ४१ |
| ● आमची भावना | ४८ |
| ● नये वर्ष के आशीर्वाद | ४९ |
| ● सेवा भी सद्‌भाव सभर | ५३ |
| ● क्यों चलते है, व्यर्थ विचार ? | ५५ |
| ● अन्तरंग - शुध्दि | ५६ |
| ● हास्य जागृति | ५७ |
| ● सुखी जीवन की चाबियाँ | ६७ |
| ● अजीर्ण में भोजन त्याग एवं कालोचित भोजन | ६८ |
| ● उत्क्रांती करणारी मकर संक्राती | ७५ |
| ● धर्माच्या कॉलम मध्ये जैन लिहा | ७६ |
| ● जबकि | ७७ |
| ● गुरु दीपक : गुरु चाँदनो | ७९ |
| ● जय जिनेंद्र हम बोलें | ८० |
| ● तुम्ही फक्त नाही म्हणा | ८३ |
| ● हम सहन क्यों करें ? | ८३ |
| ● ताण तणाव मुक्ति सूत्र... सबंध सुधार | ८४ |
| ● बहुमुल्य वस्तु | ८५ |
| ● जैन धर्म एक दृष्टी में | ८५ |
| ● क्यों जिएँ धर्म के उसूल | ९१ |
| ● भगवती सूत्र सेमिनार - तप आणि व्रत | ९२ |
| ● श्रुतदीप रिसर्च फौंडेशन, पुणे | ९३ |

| | | | |
|---|---|---|---|
| ● जैन सोसायटी, शिकागो अमेरिका | ९४ | ● भगवान बाहुबली पर विशेष डाक | १०३ |
| ● दिगंबर जैन संस्था – दिल्ली | ९५ | ● हृदयरोग – समस्या व समाधान | १०५ |
| ● रांका ज्वेलर्स, पुणे – पुरस्कार | ९७ | ● आचार्य शिवमुनी – विज्ञप्ती | १०९ |
| ● डॉ. सौ. सुधा कांकरिया, अहमदनगर | ९७ | ● भगवान महावीर की बहुमुखी प्रतिभा | ११० |
| ● टॅलेंट सुपर स्टार की धूम | ९९ | ● अरिहंत जागृती मंच, पुणे | ११३ |
| ● पुणे पांजारपोळ ट्रस्ट – भोसरी | १०१ | ● श्री बडी साजन श्री संघ, अहमदनगर | ११३ |
| ● पार्श्वनाथ जयंती – अहिंसा दिन | १०३ | ● विविध धार्मिक व सामाजिक, राजकिय बातम्या | |


जैन जागृति मासिकाचे वर्गणी दर ❖ एका वर्षात तीन मोठ्या अंकासहित

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पंचवार्षिक | रु. २२०० | त्रिवार्षिक | रु. १३५० | वार्षिक | रु. ५०० रु. |

या अंकाची किंमत ५० रुपये.

● www.jainjagruti.in
● www.facebook.com/jainjagrutimagazine


# जैन जागृति मासिकाचे ग्राहक बना !

- वीतराग वाणी, आचार्य, साधू, साध्वी यांचे लेख, धार्मिक, सामाजिक व शैक्षणिक लेख, धार्मिक कथा, बोधकथा, ऐतिहासिक पुरुषांचे जीवन चरित्र, तीर्थक्षेत्र परिचय, समाज प्रबोधन लेखमाला, दीपावली पूजन विधी व मुहूर्त, आरोग्य व गृहोपयोगी लेख, विविध बातम्या इ. साहित्य जैन जागृतित प्रकाशित केले जाते.
- आपण स्वत: जैन जागृतिचे ग्राहक बना व आपले नातेवाईक, मित्र, व्यापारी बंधू इत्यादींना वर्गणीदार नसतील तर त्यांना वर्गणीदार होण्यास सांगा. ● 'जैन जागृति' मासिकाची वर्गणी भरून इतरांना भेट पाठवा.

**सुसंस्कार व सदाचाराचा पुरस्कार करणाऱ्या 'जैन जागृति' मासिकाचे वर्गणीदार व्हा !**

## जैन जागृति – वर्गणीचे दर

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पंचवार्षिक | रु. २२०० | त्रिवार्षिक | रु. १३५० | वार्षिक | रु. ५०० |

वर्गणी व जाहिरात – रोख/मनिऑर्डर/ड्राफ्ट/AT PAR चेक/ पुणे चेकने / RTGS / SBI Online / Jain Jagruti Website इत्यादी द्वारा पाठवावी.

**JAIN JAGRUTI - BANK ACCOUNT DETAILS**

Bank : STATE BANK OF INDIA  Branch : Market Yard, Pune 37.
Current A/c No. : 10521020146  IFS Code : SBIN0006117

# गुरू आनंद तीर्थ, चिचोंडी
# पहिल्या टप्प्याचा लोकार्पण सोहळा उत्साहात संपन्न



आचार्य भगवंत आनंदऋषिजी म.सा. यांनी सामाजिक बांधवांच्या सर्वांगीन विकासासाठी आयुष्य वेचले, वेगवेगळ्या संप्रदायांना एकत्र आणून श्रमणसंघाची स्थापना केली. व साक्षरतेसाठी व जैन धर्माच्या अध्ययनांसाठी अनेक शैक्षणिक संस्थांची स्थापना केली. त्यांचे जीवन चरित्र हे अभ्यासाचा विषय असून स्वत:चा विचार न करता विश्वशांतीचा विचार करावा या त्यांनी दिलेल्या संदेशाचे सर्वांनी अनुकरण करावे अशी अपेक्षा प.पू. प्रवीणऋषिजी महाराज यांनी व्यक्त केली. तसेच त्यांच्या जन्मस्थानी उभारण्यात येणारे आनंद तीर्थ हे भाविकांच्या सर्व समस्यांचे समाधान करणारे तीर्थ असेल तसेच त्यांच्या १२५ व्या जन्मशताब्दी वर्षात १ जानेवारी २०२५ ते १ जानेवारी २०२६ पर्यंत आनंदतीर्थ येथे वर्षावास करण्याचा मानस देखील प.पू प्रवीणऋषिजी महाराज यांनी व्यक्त केला.

जैन आचार्य आनंदऋषिजी महाराज यांचे जन्मस्थळ असलेल्या नगर जिल्ह्यातील शिराळ चिचोंडी येथे आनंद फौंडेशनच्या वतीने आनंद तीर्थ उभारले जात असून त्यातील पहिल्या टप्प्यात झालेल्या सुमारे २० कोटी रूपये खर्चाच्या गुरूचरण तीर्थ, तपस्यालय, वृद्धाश्रम, कर्मचारी निवास व गौतम प्रसादालय या कामांचा लोकार्पण सोहळा व दुसऱ्या टप्प्यात होणाऱ्या ऑडिटोरियम, नवकार कलश तीर्थ, श्रुतपीठ, गौतमलब्धी यंत्र, आनंद दर्शन तीर्थ, वाचनालय व इतर कामांचे भूमिपूजन रविवारी दि. १७ डिसेंबर रोजी करण्यात आले.

यावेळी अहमदनगर येथील उद्योजक श्री. नरेंद्रजी फिरोदिया यांच्या हस्ते गुरू चरण तीर्थ, बेंगळुरू येथील सैनिकराजजी चोरडिया परिवाराच्या हस्ते तपस्यालय व पुणे येथील संतोषजी नहार परिवाराच्या यांच्या हस्ते गौतम प्रसादालयाचे उद्घाटन करण्यात आले.

सकाळी आनंदऋषिजी महाराजांच्या प्रतिमेची मिरवणूक काढण्यात आली. या सोहळ्या मुळे चिचोंडी गावाला जत्रेचे स्वरूप आले होते. पुणे, नगर, पाथर्डी, सुरत, धुळे, इंदौर, सिकंदराबाद, औरंगाबाद, शिर्डी, राहता, श्रीगोंदा, बीड, शिरूर आदी गावातून बसेसची व्यवस्था करण्यात आली होती. पाथर्डी तालुक्यातील जैन बांधवांनी आपला व्यवसाय बंद ठेवून या कार्यक्रमाला हजेरी लावली.

प.पू. प्रवीणऋषिजी म.सा. म्हणाले की, धार्मिक ठिकाणी जाऊन दर्शन घेण्या पेक्षा सेल्फी घेण्याकडे भाविकांचे अधिक लक्ष असते, हे चुकीचे असून धार्मिक ठिकाणी जाऊन मौन बाळगून दर्शन घेतल्यास अधिक समाधान मिळते. आजपर्यंत मानवाला सुधारण्यासाठी अनेक विचार संतांनी मांडले मात्र तरीही मानव मात्र सुधारला नसल्याने आता व्यवस्था बदलायला हवी. आनंद ऋषिजींची जन्मभूमी ही प्रत्येक मातापित्यांची जन्मभूमी असून आणखी आठ वर्षानंतर आनंदऋषिजी यांची १२५ वी जयंती आपण साजरी करणार असून त्या वेळी एक पूर्ण वर्ष आपण येथे राहणार आहोत. संपूर्ण विश्वाला शांतीचे संदेश देणारे तीर्थ या ठिकाणी साकारत आहे. गर्भ संस्कारासह विविध संस्कार दिले जाऊन अनेक प्रश्नांची उकल या ठिकाणी आल्यावर

होणार आहे, अंधश्रध्दा विरहीत पिढी निर्माण करण्याचे जे स्वप्न आनंदऋषिजी महाराजांनी पाहिले होते ते पुर्ण करण्याचे काम आपण सर्वांनी मिळून करायला हवे, असे त्यांनी सांगितले.

प.पू.श्री प्रवीणऋषिजी म.सा. पुढे म्हणाले की, ''हे आनंदतीर्थ ना पुजा अर्चाचे ना मन्नत मागण्याचे ना अडंबराचे तीर्थ असेल तर भूलोका वरील स्वर्ग निर्माण करणारे तीर्थ असेल ! व्यक्ती, परिवार आणि समाजाला तीर्थ बनविणारे हे तीर्थ असेल. प्रत्येक व्यक्तीच्या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी तसेच प्रत्येक व्यक्तीला मदत करणारे तीर्थ ठरावे हेच स्वप्न घेऊन या आनंद तीर्थाची निर्मिती होत आहे.''

प.पू रमणीकमुनीजी म.सा. यांनी हे स्थानकवासी जैन समाजाचे प्रथम तीर्थ निर्माण होत असून स्थानकवासी जैन बांधवांसाठी हे श्रद्धास्थान बनेल असा विश्वास व्यक्त केला.

हा कार्यक्रम उपप्रवर्तक भंते प.पू.श्री. पारसमुनीजी म.सा. आदि ठाणा, आनंद तीर्थ प्रेरक प.पू. श्री प्रवीणऋषिजी म.सा. आदि ठाणा, श्रमणसंघीय सलाहकार वाणी के जादूगार प.पू श्री. रमणीकमुनीजी म.सा. आदि ठाणा, प.पू.श्री लोकेशऋषिजी म.सा. आदि ठाणा, प.पू श्री. श्रेयसऋषिजी म.सा.आदि ठाणा, मधुर भाषी प.पू. श्री परागमुनिजी म.सा.आदि ठाणा, महाप्रज्ञा डॉ. प.पू श्री. प्रियदर्शनाजी म.सा. प.पू.श्री.विश्वदर्शनाजी म.सा., प.पू.श्री.प्रीतिदर्शनाजी म.सा. आदि ठाणा, नवकार आरधिका प.पू.श्री. प्रतिभाकुंवरजी म.सा., प.पू.श्री. सिद्धिसुधाजी म.सा., प.पु.श्री अनुप्रेक्षाजी म.सा. आदि ठाणा, तप वीरांगना प.पू.श्री. संतोषजी म.सा. आदि ठाणा, मितभाषी प.पू.श्री.सुनंदाजी म.सा. आदि ठाणा, प.पू. ज्ञानप्रभाजी (सरल) म.सा., प.पू श्री. करूणाश्रीजी म.सा., प.पू श्री किर्तीसुधाजी म.सा. यांच्या पावन सान्निध्यात संपन्न झाला.

हा कार्यक्रम संपुर्ण भारत वर्षातून आलेल्या २० हजाराहून अधिक भाविकांच्या सान्निध्यात संपन्न झाला. या कार्यक्रमास खासदार श्री. दिलीपजी गांधी, आमदार श्री. शिवाजी कर्डिले, आमदार श्री. प्रशांतजी बंब, माजी आमदार श्री. अनिलजी राठोड, कॉन्फरन्सचे अध्यक्ष श्री. मोहनलालजी चोपडा, श्री. पारसजी मोदी, श्री. विजयकांतजी कोठारी, अनेक संघाचे अध्यक्ष, अनेक मान्यवर उपस्थित होते.

गुरू आनंद फौंडेशनचे ट्रस्टी श्री. सुनीलजी नहार यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

आनंद फौंडेशनचे अध्यक्ष श्री. सतीशजी सुराणा यांनी प्रास्ताविकात प्रकल्पाची माहिती देत हा प्रकल्प ४ टप्प्यात पुर्ण करण्याचा मानस व्यक्त केला. दुसऱ्या टप्प्यात तीर्थाचे काम पुढील दोन वर्षात पुर्ण करण्यात येणार असून तिसऱ्या टप्प्यात शैक्षणिक संकुल व चौथ्या टप्प्यात अध्यावत ध्यान केंद्र उभारण्यात येणार असल्याची माहिती दिली व तसेच या भव्य प्रकल्पासाठी योगदान देण्याचे आवाहन केले व त्यास भाविकांनी चांगलाच प्रतिसाद दिला.

आनंद तीर्थच्या या भव्य उभारणीस अनेक मान्यवरांनी उत्सुर्फतपणे मोठी दान राशी फाऊंडेशनला समर्पित केली. व अनेकांनी दान देण्याची भावना व्यक्त केली. प्रमुख दान दात्यांची नावे पुढीलप्रमाणे

**• श्रध्दा तीर्थ निर्माणचे प्रमुख सहयोगी – श्रीमान सुभाषजी प्रशांत मुथा, पुणे • संस्कार तीर्थ निर्माणचे प्रमुख सहयोगी – श्रीमान नवरतनजी चोरडिया, चेन्नई • सेवा तीर्थ निर्माणचे प्रमुख सहयोगी – श्रीमान स्वरूपचंदजी कोठारी, सिकंदराबाद.**

**आनंद तीर्थ निर्माणचे विशेष सहयोगी सदस्य**

• श्रीमान रमणलालजी कपूरचंदजी लुंकड, पुणे

• श्रीमान डॉ. सुरेंद्रजी, डॉ. विरेंद्रजी विनोदकुमारजी ओस्तवाल, परभणी, पुणे • श्रीमान प्रमोदकुमारजी माणिकचंदजी दुगड, पुणे • श्रीमान खिवराजजी

नवरतनमलजी चोरडिया ॲण्ड सन्स, चेन्नई ● श्रीमान अभयजी एवं उषाजी श्रीश्रीमाळ, चेन्नई ● श्रीमान सुरेंद्रजी रिखबदासजी संचेती, पुणे ● श्रीमान रविंद्रजी मिश्रीलालजी लुणावत, पुणे ● श्रीमान सुनिलजी सचिनजी नहार, पुणे ● श्रीमान देवराजजी सैनिकराजजी चोरडिया, बेंगलोर ● श्रीमान अजयजी मदनलालजी भंडारी, पुणे ● श्रीमान किरणजी माणिकचंदजी बोरा, पुणे ● श्रीमान विलासजी थानमलजी पालरेशा, पुणे ● श्रीमान डॉ. सुमतीलालजी माणिचंदजी लोढा, पुणे ● श्रीमान रविंद्रजी शंकरलालजी नहार, पुणे ● श्रीमान किशोरजी बन्सीलालजी संचेती, पुणे ● श्रीमान हिरालालजी सतीशजी सुराणा, पुणे ● कु. प्रार्थना सुरेंद्रजी संचेती, पुणे ● श्रीमान सुमतीलालजी एवम् सुनीताजी छजलानी - इंदौर ● श्रीमान नरेंद्रजी शांतीकुमारजी फिरोदिया - अहमदनगर ● श्रीमान अशोकजी धनराजजी पितळे, अहमदनगर ● श्रीमान विलासजी प्रवीणजी कटारिया - अहमदनगर ● सी.ए. श्रीमान सुनीलजी कोटेचा - लातूर ● श्रीमान आनंदजी चोरडिया - पाथर्डी ● धर्मभगिनी - पुणे ● गुरुभक्त-जोधपूर

याशिवाय अनेकांनी दानराशी समर्पित केली.

**कार्यक्रमाचे उत्कृष्ट आयोजन**

गुरु आनंद फौंडेशन सर्व कार्यकारिणी सदस्य, गौतम निधी संघ - पुणे, नहार परिवार - पुणे व पुणे, नगर, पाथर्डी इ. गावातील अनेक कार्यकर्त्यांनी मिळून या भव्य कार्यक्रमाचे आयोजन केले. बाहेर गावाहून आलेल्या सुमारे ८०० लोकांची निवासाची व्यवस्था अहमदनगर येथे अतिशय उत्तमरित्या करण्यात आली.

या कार्यक्रमासाठी पुणे शहरातून विविध भागातून सुमारे ६० बसेस व बाकी महाराष्ट्र व परप्रांतातून सुमारे १०० बसेस असे एकूण १६० बसेस या दिवशी या कार्यक्रमाला आल्या होत्या. या शिवाय शेकडो चारचाकी वाहने चिचोंडी येथे आल्या होत्या. एवढी वाहने येवूनही वाहतूकीचा अडथळा व कुठेही ट्रॅफीक जाम झाले नव्हते. पार्किंगची व्यवस्था उत्तमरित्या करण्यात आली होती.

गौतम प्रसादीची व्यवस्था ही फार सुंदर करण्यात आली. प्रमुख अतिथीसाठी, गावातील स्थानिक लोकांसाठी व बाकी सर्व भक्तांसाठी असे तीन मंडप उभारण्यात आले होते. कुठेही धक्काबुक्की न करता सर्वांना गौतम प्रसादीचा लाभ घेता आला.

सुमारे ५० साधू-संत या कार्यक्रमास उपस्थित होते. या सर्व साधू-संतांची विहारामध्ये चांगली व्यवस्था करण्यात आली.

आनंद तीर्थ प्रेरक उपाध्याय श्री प्रवीणऋषिजी म.सा. आनंद तीर्थच्या पहिल्या चरणच्या लोकार्पण सोहळ्यासाठी हैद्राबाद येथून सुमारे ५०० कि.मी.चा उग्रविहार करुन चिचोंडी येथे आले. चिचोंडी येथील कार्यक्रमानंतर २२ डिसेंबरला अहमदनगर येथे आचार्यश्रीजीची समाधी दर्शन आले. चेन्नई येथे चातुर्मासा साठी सुमारे १२०० कि.मी.चा विहार सुरु केला आहे.

संपूर्ण कार्यक्रमाचे लाभार्थी पुणे येथील श्री. सुनीलजी सचिनजी नहार व परिवार होते.

श्री. अनिलजी नहार यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले व महामांगलिकाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. ●

महाराष्ट्रातील जास्तीत जास्त जैन समाजापर्यंत पोहचण्याचा सर्वात खात्रीशीर, सर्वात सोपा व सर्वात स्वस्त मार्ग...

जैन जागृति

तीर्थंकर प्रभु महावीरांचे अंतिम वचन, श्रीमद् उत्तराध्ययन सूत्रावर आधारीत

# ।। जिनेश्वरी ।।

**प्रवचनकार : उपाध्याय श्री प्रवीणऋषिजी म.सा.**

**भावानुवाद : साध्वी श्री ओजसदर्शनाजी म.सा., सौ. योगिता चंगेडे** *(क्रमश:)*

## अध्याय २१ – समुद्रपाल

**'सौभाग्य व दुर्भाग्य अशा दोन्ही पर्वात**
**जो एकसमान राहतो,**
**अशा धीर पुरूषाची शक्ति**
**कधीच उद्विग्न होत नाही.'**

### जशी दृष्टी तशी सृष्टी

माणसांनी माणसासारखंच जगावं, माणसांची पत माणसाच्या हातात असते. काही माणसं अशी असतात की त्याचे जगणे वागणे पाहून समोरच्या व्यक्ति जीवनात स्वत:ला सावरून जातात, सांभाळून घेतात व काही माणसं अशी असतात की त्यांना स्वत: परमात्मा जरी सांभाळण्यासाठी – सावरण्यासाठी आले तरी ते भरकटत जातात. जशी तुमची दृष्टी तशी सृष्टी. या कथेच्या कथा नायकाला ना जातीस्मरण ज्ञान होते, ना योगी महापुरूषांचे कधी उद्‌बोधन मिळते. केवळ एका अपराध्याला दंडित होताना पाहून त्याच्या अंतरंगातील ज्ञान – दर्शन– चरित्र जागृत होते व त्यानंतर संयम घेऊन संकल्पबद्ध होतो की ज्या ज्या कारणांनी दंडीत व्हावे लागते. ते कर्म करायचे नाही. अशा या समुद्रपालाच्या जीवन साधनेचा मार्ग धर्म जाणिवेत रूजवणारा अध्याय आहे.

चंपा नगरीतील पलीत नावाचा एक व्यापारी भ. महावीरांच्या काळातील एक श्रावक एकदा व्यापाराच्या निमित्ताने परदेशात गेला. व्यापार करताना काही सहयोगी व्यापाऱ्यांपैकी एकाला तो आवडला. त्याने त्याला आपली मुलगी दिली. त्याला जावई केले, धन दिले गर्भवती पत्नीला घेऊन तो आपल्या देशात परत येण्यास निघाला, समुद्रामार्गे येताना मधेच त्याची पत्नी प्रसुत झाली, मुलगा झाला. समुद्रावरती जन्मला म्हणून मुलाचे नाव समुद्रपाल ठेवण्यात आले. करोडोंची संपत्ती घेऊन आलेला पलीत व्यापारी चंपा नगरीत येऊन पत्नी व मुलाबरोबर रहात होता.

यथाक्रम समुद्रपाल कला – नीती पारंगत होत तारूण्यवस्थेस प्राप्त झाला. सुंदर व आकर्षक दिसणाऱ्या समुद्रपालचा विवाह रूपिणी नावाच्या कन्येबरोबर झाला. रमणीय राजवाड्यामध्ये संसाराचे सुख उपभोगू लागला.

एकदा महालाच्या खिडकीतून त्याने पाहिले की, एका अपराध्याला फाशीच्या शिक्षेसाठी घेऊन जात आहेत. त्याकाळी अशी परंपरा होती की अपराध्याला लाल कण्हेराची फूलमाळ घालून लाल कपडे घालुन लाल गाढवावर बसवून रस्त्यातून वाजत–गाजत नेत असत. त्यामागे कारण होते की सर्व प्रजेला, नगरीतील लोकांना अपराधाचे भय वाटावे, अपराधी कसा दंडीत होतो हे पहावे व अपराध करण्यास प्रवृत्त होऊ नये.

### अपराध्याला पाहून समुद्रपालचे चिंतन

या अपराध्याला वधस्थळी नेत असताना चौका–चौकात त्याच्या अपराधाची व त्याच्या शिक्षेची घोषणा होत होती. अपराध्याचा चेहरा मृत्यूच्या भयाने काळा पडला होता. अपराध्याच्या व शिक्षेच्या वारंवार घोषणांनी हे भय अधिकच दुसह्य होत होते; परंतु आता त्याला यापासून कोणी वाचवू शकत नव्हते व अशा या

असहाय्य, असमर्थपणे चाललेल्या या अपराध्याला पाहून समुद्रपालच्या अंतरंगात चिंतन चालू झाले. 'कोण दंडित करीत आहे याला ?... जो याला बांधुन नेत आहे तो... ? नाही ... कर्मच याला दंड देत आहे. अपराध करतांना याने चिंतन केले नाही, आता याला कोणी वाचवू शकत नाही. त्याच्या अशुभ कर्माचा परिणाम त्याला मिळत आहे... जशी करणी तशी भरणी.. कृत्य वाईट तर परिणाम वाईट ... नाही... नाही.. या चक्रातून बाहेर पडायलाच हवे..'

समुद्रपालला जाणवलं की मी पण बंधनातच आहे. या अपराध्यासारखी वेळ येण्यापूर्वीच, बंधन तोडण्याची असमर्थता येण्यापूर्वीच मला सावध व्हायला हवं. ज्यावेळी बंधन तोडण्यास समर्थ आहे त्याचवेळी मला बंधनमुक्त व्हायला हवं. आणि तो माता-पित्याकडे जाऊन म्हणाला ''तात-मात मी बंधनमुक्त होऊ इच्छितो. तुमचं वात्सल्य बंधन आहे, माझे भोग बंधन आहे, माझी आसक्ती बंधन आहे. या बंधनांना तोडून मी नि:संग होऊ इच्छित आहे.'' माता पित्यांनी त्याच्या अंतरंगातील भाव जाणून त्याला संन्यासाची आज्ञा दिली. मुनिदीक्षा घेतल्यानंतर तो कसा या पथावर विचरण करू लागला याचे वर्णन आहे. सव्वेंहिं भुएहिं दयाणुकंपी.... सर्व प्राणिमात्रांविषयी त्याच्या मनात, हृदयात दया, अनुकंपा आहे. या दया व अनुकंपेमुळे तो शांती व क्षमा धारक बनून सर्व प्रकारच्या पापजनक गोष्टींचा त्याग करीत तो मार्गक्रमण करू लागला. आपल्या सर्वांच्या जीवनोपयोगी असा पुढील श्लोक आहे.

अणुन्नए नावणए महेसी, न यावि पुयं गरहं च संजए ।
स उज्जुभावं पडिवज्ज संजए, निव्वाणमग्गं विरए उवेइ ।।

**सौभाग्य व दुर्भाग्यात समभावी सफल**

बऱ्याच वेळा, जीवनात असे प्रसंग येतात की, गर्वाने व्यक्ती ताठ बनते. एखादे अशक्य प्राय, कार्य केले अतुलनीय यश मिळाले. आदर सत्कार झाला की गर्व आलाच. प्रभु सांगतात मान ताठ करू नका, गर्वाने चढु नका, अकड येऊ देऊ नका. असेही प्रसंग काही वेळा जीवनात येतात की ज्याने हात जोडायला हवे होते तो लाथ मारू लागतो. ज्याने मान राखायला हवा होता तो अपमान करू लागतो. तेव्हा प्रभु सांगतात अशा वेळी मान खाली घालू नका, दु:खी बनू नका.

जीवनात अहंकार करण्याचेही प्रसंग येतील व अपमान झेलण्याचेही प्रसंग येतील, पुरस्कार मिळाला तरी हुरळून जाऊ नका, गर्व करू नका व तिरस्कार मिळाला तरी पळून जाऊ नका, मान खाली घालू नका दोन्हीही परिस्थितीत सरळमनाने, समभावाने रहा.

कोणी प्रणाम केला तरी स्वत:ला श्रेष्ठ समजू नका व कोणी प्रणाम नाही केला तरी स्वत:ला कनिष्ठ समजू नका. कोणत्याही परिस्थितीत लाचार बनू नका. व दुसऱ्यालाही लाचार बनण्यास भाग पाडू नका. दीनपणाने जगु नका व दुसऱ्यालाही दीन बनवू नका जीवन यापन करीत असताना या दोन्ही बाजू सांभाळल्या, दोन्हीही परिस्थितीत जर समभाव राखला गेला सहजभाव राखला गेला तर त्याच्या जीवनात बाधा त्याला उद्विग्न करीत नाही व तो निर्वाण मार्गाला प्राप्त होतो.

सुर्यास्ताच्या समयी पण आकाश लाल असते. व सूर्योदयाच्या समयी पण आकाश लाल असते. एक सौभाग्याचे पर्व आहे तर एक दुर्भाग्याचे. या दोन्ही पर्वामध्ये जो एकसमान राहतो. सहज, सरळ राहतो अशा धीरपुरूषाच्या अंतरंगातली आत्मशक्ती कधीच उद्विग्न होत नाही. निर्वाण शब्दाचा अर्थ समजायचा असेल तर असे सांगता येईल की समजा एखादा बॉंब आहे व निकामी केला तर त्या गोळ्यामध्ये दारू तर असते पण स्फोट होण्याची त्याची क्षमता संपते. आपल्या कार्मण शरीरात जे कर्मवर्गाचे स्फोटक भंडार असते त्याला निकामी करणे, स्फोटरहीत करणे म्हणजे निर्वाण. अंतरंगातील सर्व ऊर्जा, शक्ति यांचा उद्रेग न होणे म्हणजेच निर्वाण. समुद्रपाल असाच धीरपुरूष होऊन

चालत होता.

प्रभू पुढे सांगतात, ''विश्वात खूप प्रकारचे लोक असतात व हे मोठे विविधरंगी लोक साधकाला प्रभावित करत आसतात. जसं जंगलात वाघ पण असतो व लांडगा पण असतो. लांडगा आवाजाने भयभीत होतो व वाघ कोणत्याही आवाजाला भीक घालीत नाही. तो आवाज करणाऱ्याकडे पाहतो, आवाज ऐकत नाही. जसा वाघ आवाजाकडे दुर्लक्ष करतो, भयभीत होत नाही तसेच साधकाने जीवनात कितीही वाद-विवाद येवो, प्रवाद येवो आपले कान वाघाच्या कानाप्रमाणे बनवून त्या आवाजांना न पाहता निरंतर चालत राहिले पाहिजे.

कितीही जोरात हवा आली तरी मेरू पर्वताला हलवू शकत नाही. त्याप्रमाणे साधकाच्या जीवनात अनुकूलतेचे प्रतिकुलतेचे कितीही वादळ आले तरी जो आपल्या मार्गापासून विचलित होत नाही. त्याचे मन कंपित होत नाही. अशी व्यक्ती सफलता प्राप्त करते, पूजनीय बनते.

एक सहज विचारधारणा आहे. पूजा कोणाची व्हायला हवी ? धन पूजनीय की धर्म ? श्रोत्यांनो, लक्षात ठेवा, धनाचा उपयोग केला जाऊ शकतो, पूजा नाही. प्राप्ती पुण्याची झाली पाहिजे व पूजा परमात्म्याची झाली पाहिजे असं झालं तर कधी अहंकार करण्याची वेळ येत नाही व आपल्याकडून कोणाचा अपमान होत नाही व समुद्रपाल आपल्या जीवनात प्रकट होतो. समुद्रपाल पाप व पुण्य अशा दोन्ही कर्मांचा क्षय करून विमुक्त होऊन, या विशाल संसार-सागरात तरूण निर्वाण मार्गास प्राप्त होतात. ●

## कव्हर तपशील - जानेवारी २०१८

आचार्य सम्राट श्री आनंदऋषिजी म.सा. जन्मभूमी चिचोंडी येथे गुरु आनंद फौंडेशन द्वारा ३५ एकर मध्ये भव्य आनंद तीर्थ निर्माण केले जात आहे. रविवार दिनांक १७ डिसेंबर २०१७ रोजी प्रथम चरणचे लोकार्पण समारोह व द्वितीय चरण भूमीशुध्दी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची क्षणचित्रे पुढीलप्रमाणे -

१) या कार्यक्रमास उपप्रवर्तक श्री पारसमुनीजी म.सा., आनंद तीर्थ प्रेरक प.पू. श्री प्रवीणऋषिजी म.सा., सलाहाकार श्री रमणीकमुनीजी म.सा. आदी सुमारे ५० साधु-साध्वी उपस्थित हाते.

२,३) आनंद चरण तीर्थ उद्घाटन प्रसंगी साधु-साध्वी, श्रावक-श्राविका तर्फे जाप करण्यात आला.

४,५) या भव्य कार्यक्रमास संपूर्ण भारतातून सुमारे वीस हजार भक्तगण उपस्थित होते.

६) गुरु चरण तीर्थचे उद्घाटन अहमदनगर येथील उद्योजक श्री. नरेंद्रजी फिरोदिया व त्यांच्या परिवाराच्या हस्ते करण्यात आले.

७) तपस्यालयचे उद्घाटन बेंगलोर येथील श्री. सैनिकराजजी चोरडिया व त्यांच्या परिवाराच्या हस्ते करण्यात आले.

८) गौतम प्रसादालयाचे उद्घाटन पुणे येथील श्री. संतोषजी नहार व त्यांच्या परिवाराच्या हस्ते करण्यात आले.

९) आनंद तीर्थच्या दुसऱ्या टप्प्याचे भूमीशुध्दी कार्यक्रम सर्व साधु-साध्वी, मान्यवर, श्रावक-श्राविका यांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

१०) लोकार्पण समारोह कार्यक्रमाचे संपूर्ण लाभार्थी श्री. सुनीलजी व श्री. सचिनजी नहार व त्यांच्या परिवाराचे पुणे येथील नहार परिवारा तर्फे सन्मान करण्यात आला.

११) चिचोंडी गावातील जैन स्थानका पासून आनंद तीर्थ पर्यंत भव्य मिरवणूक काढण्यात आली. ●

# क्यों चलते हैं व्यर्थ विचार ?

**लेखिका : आगम वेत्ता साध्वी वैभवश्री 'आत्मा'**

हर वक्त विचार चलते ही रहते हैं, ऐसे में क्या करें ? क्यों होता है ऐसा ?'

यह समस्या और जिज्ञासा आज अनेकों के भीतर है । इनका समाधान जानने से पहले यह जानें कि क्यों चलते रहते हैं व्यर्थ विचार... ? इनका कारण है -

१. शंका, अनिश्चितता; २. आत्मविश्वास की कमी; ३. अधैर्य; ४. आत्मप्रेम व क्षमा का अभाव; ५. आदतन संस्कार; ६. औरों की निगाहों में प्रमाणित होने की इच्छा; ७. भय आदि संज्ञा के कारण ।

इन उपरोक्त कारणों को अपने भीतर देखें, जानें। जानें कि आपकी बाधा क्या है ? अपने अन्तर् को परखें । निरीक्षण करें । आपको खुद ही पता चल जाएगा कि आप व्यर्थ क्यों सोचते रहते हो । अपने मोह को देखें । मोह-इच्छाएँ ही आपकी काल्पनिक दुनिया के निर्माण का कारण है । अत: खुद की ग्रन्थि को जानें। जितना-जितना स्वयं की ग्रन्थि को पहचानते जाएँगे, उतना-उतना उससे मुक्त भी होते जाएँगे ।

'जानना ही जीतना है ।' विराट गुरूजी के इस आप्त वाक्य को सदा स्मृति में रखें और धैर्यपूर्वक आत्मनिरीक्षण करते रहें ।

विचारों का प्रवाह तत्व के अज्ञान के कारण है। जब तक वस्तु तत्त्व का स्वरूप ज्ञान नहीं हो जाता, तब तक ही चिंताएँ-भय-आशंकाएँ-कल्पनाएँ डेरे जमा पाती है । इसके लिए वस्तु तत्व का स्वरूप ज्ञान प्राप्त करें ।

जानें कि हमारा वास्तविक स्वरूप क्या है ? जीवन में आ रहे सुख-दुख का निर्माता कौन है ? आपकी किस्मत की रचना कौन करता है ? अनुकूल वातावरण को कैसे जीना ? प्रतिकूलता आए तो उसे कैसे समझना, उससे क्या सीख लेनी ? हमारे जीवन का इष्ट-लक्ष्य क्या है ? पुण्य-पाप आदि तत्त्वों का स्वरूप क्या है ? खुद को वर्तमान स्वरूप में स्वीकारते जाएँ ताकि द्वन्द्व व भयों का निराकरण होता जाएगा । हमारा वास्तविक स्वरूप प्रेम व ज्ञानमय है । आनंदमय है । दुख, शोक, पीड़ा, संताप, शिकायत, उलाहना, अहं, वासना-ये सब हमारा निज रूप नहीं है । इन्हें अपने भीतर आए वायरस की तरह जानें और तुरंत सम्यक् सोच, स्वाध्याय, भक्ति व प्रेम के एंटीवायरस का उपयोग करें । चिंतन के प्रवाह को बदलें ।

हमारे विचारों में रही हुई conditioning ही हमें दुख-सुख का अहसास कराती है । दुख-सुख वास्तविक नहीं है, काल्पनिक है - यह बात अपने से समझो, तो पीड़ाएँ शांत होती जाएगी । हमारी सोच, हमारी भावना व हमारी जीवनशैली ही हमारे 'कल' की (Future) रचना करती है । जिसका जैसा मत, उसकी वैसी किस्मत । अत: संभालो, आपकी किस्मत के रचयिता आप खुद ही हैं ।

जब अनुकूल वातावरण मिले, पुण्य भोग के अवसर मिले, तब सुविधाओं के गुलाम मत बनना, असुविधाओं को निमंत्रण मत देना, खुद पर बलात् कार्य भार मत थोपना, कंजूसी करके कष्ट मत भोगना, अपने अंदर अहं को प्रविष्ट नहीं होने देना, प्राप्त हर सुविधा का सदुपयोग करना, आवश्यक उपभोग करना व शेष का संविधान (सम्यक् वितरण) करना, प्रतिपल सबके आभारी रहना ताकि फिर पछताना ना पड़े ।

जब कभी प्रतिकुलताएँ मिले तब उसे अपनी भूल का अवसर समझना । आलोचन, निरीक्षण व प्रतिक्रमण करना ताकि प्रतिकूलताओं के कारणों को जान कर उनको संवरित किया जा सके । दुबारा भूलें न हो- इस हेतु समझ व भावशुद्धि प्रकटाना । प्रतिकूलताओं से न घबराना, न ही प्रतिक्रियात्मक रवैया अपनाना तथा न ही किसी अन्य को उसके लिए आरोपित करना । विराट गुरूजी की आप्त वाणी को स्मृति पथ पर लाना कि -

हर चुनौती है नया सोपान किस्मत की किताब का ।

क्या चुराना आँख किरण का तेज है ये आफताब का ।।

चुनौतियों को आगे बढ़ने का अवसर समझकर आगे बढ़ जाना । वहाँ अटकना मत । अपने दुखों के गीत गाना ही मत । यह जानना कि हमारे जीवन का इष्य, लक्ष्य – खुद को योग्य बनाना है, विशुद्ध बनाना है और फिर अपनी योग्यताओं से सबको आनंदित करना है । सबको सहयोगी बनाना सीखो । जो सदा प्रसन्नमना सद्भावयुक्त जीता है, वह पुण्यवान जीव है। इसके विपरीत जीने वाला दुखी, उदास, शिकायती व पापी जीव है । खुद को सम्भालना सीखें । सकारात्मक गीत गाएँ, मुस्कुराते हुए हर दिन का स्वागत करें । अतिसोच की बिमारी आपके भीतर से ठीक उसी तरह गायब हो जाएगी जैसे सुर्य के प्रकाश के साथ अँधियारा गायब हो जाता है ।

ऐसा ही हो । सबका कल्याण हो ।

प्रेषक :– साधिका प्राग्भा विराट, 9799985703;
mail@charammangal.com

# अन्तरंग–शुध्दि

**आचार्यप्रवर श्री. हस्तीमलजी म.सा.**

- ✻ अगर हमारे चित्त में किसी प्रकार का दम्भ नहीं है, वासनाओं की गंदगी नहीं है और तुच्छ स्वार्थ–लिप्सा का कालुष्य नहीं है तो हम वीतराग के साथ अपना सान्निध्य स्थापित कर सकते है ।
- ✻ जिनशासन में तप का महत्व है, पर ज्ञानशून्य तप का नहीं ।
- ✻ ज्ञान न मिलने का अन्तरंग कारण तो है ज्ञानावरण कर्म और ज्ञान न मिलने का बाहरी कारण है ज्ञानीजनों की संगति का अभाव ।
- ✻ ज्ञानावरण का जोर रहा और बाहरी साधनों–संगति, पुस्तक आदि का संयोग नहीं मिला तो ज्ञान प्राप्त नहीं होगा । ज्ञानावरण का जोर घटा, क्षयोपशम हुआ और ज्ञानी की संगति मिली तो ज्ञान प्राप्त होगा ।
- ✻ जिस तत्त्व के द्वारा धर्म, अधर्म, सत्य, असत्य जाना जाय, उसको ज्ञान कहते है । ज्ञान आत्मा का गुण है ।
- ✻ जिन व्यक्तियों में सदाचार तथा सद्गुणों की सौरभ नहीं होती, वे संसार में आकर यों ही समय नष्ट कर चले जाते हैं ।
- ✻ दुर्लभ नर–जीवन को व्यर्थ में गंवाना, अज्ञानता की परम निशानी है ।
- ✻ मोह के कारण ही त्याग की बुद्धि उत्पन्न नहीं होती है ।
- ✻ गुणों का महत्व भूलकर गुणी का तिरस्कार करना उचित नहीं ।
- ✻ आत्मा की किमत सोने के आभूषणों से नहीं वरन् सदाचार, प्रामाणिकता और सद्गुणों से है ।
- ✻ यदि जीवन का निर्माण करना है तो प्रत्येक को स्वाध्याय करना पडेगा । स्वाध्याय के बिना ज्ञान की ज्योति नहीं जलेगी ।
- ✻ हमारे शिक्षणालयों का उद्देश्य होना चाहिए कि उनमें अध्ययन करने वाले छात्र सदाचारी एवं ईमानदार बनें ।
- ✻ आज के अध्यापक का जितना ध्यान शरीर, कपडे, नाखून, दांत आदि बाह्य स्वच्छता की ओर जाता है, उतना छात्रों की चारित्रिक उन्नति की ओर नहीं जाता।
- ✻ बाह्य स्वास्थ्य जितना आवश्यक समझा जाता है, अन्तरंग स्वास्थ्य उससे कहीं अधिक आवश्यक है।
- ✻ संत लोगों का काम तो उचितानुचित का ध्यान दिलाकर सर्चलाइट दिखाना है ।